UGC Approved Refereed Journal Jr.No.43053

ISSN 2394-5303

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया ™

Issue-38, Vol-02, February 2018

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research journal | Febuary 2018 Issue-38, Vol-02 | 0112

31

# दलित साहित्य आणि साहित्यशास्त्र

प्रा. सर्जेराव रणखांब
(मराठी विभाग)
देगलूर महाविद्यालय, देगलूर

**********

दलित साहित्याला वेगळ्या साहित्यशास्त्राची गरज आहे का ? हा प्रश्न वादातीत आहे. एकूणच मराठी साहित्याच्या क्षेत्रात हा प्रश्न अनेकदा ऐरणीवर आलेला आढळून येतो, परंतु त्या पाठीमागची भूमिका अनेकदा वाड्मयाबाह्यच जास्त प्रमाणात दिसून येते.दलित साहित्य मराठीच्या साहित्यशास्त्राला धरुन नाही म्हणून ते साहित्य नव्हे हे म्हणणे जितके चुकीचे आहे तितकेच दलित साहित्याला वेगळ्या साहित्यशास्त्राची, सौंदर्यशास्त्राची गरज आहे हेही तितकेच असत्य आहे. कारण आजपर्यंत कुणीही याबाबतीत गांभीर्याने विचार करुन काही निष्कर्ष काढलेला आहे असे दिसून येत नाही.

राजा ढाले यांनी अस्मितादर्शमधून (दिवाळी १९ अंक ७२) दलित साहित्य व साहित्यशास्त्रे असा लेख लिहिला आहे. परंतु या लेखाचे स्वरुप प्रतिक्रियात्मक असल्यामुळेच मराठीचे अगर दलित साहित्याच्या साहित्यशास्त्राची साधार चर्चा यातून झालेली नाही. उलट गुंतागुंतच करुन टाकलेली आहे. उदा : दलित साहित्याला अजून स्वतःचं असं सर्वांगिण साहित्यशास्त्र नाही, मराठीचं प्रचलित साहित्यशास्त्र संस्कृत + ग्रीक, साहित्यशास्त्राचं बनलेलं आहे ही दोन्ही साहित्यशास्त्रे जुनी म्हणून कालबाह्य असे समीकरणवजा उल्लेख त्यांच्या लेखातून सापडतात.

त्यांच्या एकूण लेखातून मराठीचं साहित्यशास्त्र तोकडं आणि परावलंबी आहे, उलट दलित साहित्याला स्वतःच साहित्यशास्त्र आहे असा निष्कर्ष काढला आहे पण याला कोणताच आधार त्यांनी आपल्या लेखातून दाखवलेला दिसत नाही. म्हणून ते स्विकारणे कठीण आहे.

## दलित साहित्याची निर्मिती प्रक्रिया :-

कोणत्याही साहित्याची निर्मिती प्रक्रिया गुंतागुंतीची असते. या निर्मिती प्रक्रियेचे स्वरुप लेखकपरत्वे भिन्न-भिन्न असते. दलित साहित्याच्या संदर्भात ही निर्मिती प्रक्रिया समजावून देताना अस्मितादर्शमधील 'मी व माझे लेखन' या सदरातील दलित साहित्यिकांचे आत्मकथन महत्वाचे आहे. यात प्रामुख्याने ना.रा.शेंडे, प्रा.केशव मेश्राम, बंधु माधव, राजा ढाले, योगीराज वाघमारे, ज.वि.पवार यांचा समावेश आहे. त्यांच्या या साहित्यविषयक वाटचालीतील काही ठळक मुद्दे खालीलप्रमाणे सांगता येतील.

ना.रा.शेंडे - '५०-६० वर्षांपूर्वीचा काळ दलितांसाठी केवढा उग्र केवढा भीषण ! त्या अत्यंत प्रतिकूल काळातला मी खेडूत महार. ना कसले शिक्षण | ना कसले धन आणि ना कसला आधार. नियती नेईल तिकडे माझी पावले वळली. माझे अध्यात्मिक जीवन-साहित्य खडकाळ परिस्थितीच्या जमिनीतून प्रगत झाले आहे'. (ध्अस्मितादर्श' दिवाळी अंक, १९७६ पृ.५२)

बंधु माधव - घ्डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्वालाग्राही तत्वज्ञानातील ठिणगी घेऊन, तिच्या सहाय्याने माझ्या कथाद्वारे मी दलितांना पेटवून उठवीत होतो. त्यांना चेतवीत होतोङ ('अस्मितादर्श' दिवाळी अंक, १९७६ पृ.५९)

प्रा.केशव मेश्राम - 'जीवनाशी संबंध असणाऱ्या दलित लेखकांनी निग्रहाने आपली मनोभूमी तपासली पाहिजे. काटा टोचून गेल्यावर गूळ-मीठाचा चटका द्यावा तशी भाजणी-डागणी केली पाहिजे'. ('अस्मितादर्श' दिवाळी अंक, १९७६ पृ.६६)

राजे ढाले- 'मी प्रस्थापित साहित्यिक मूल्यांच्या प्रस्थापित

साहित्याच्या आणि प्रसारित करणाऱ्या नियतकालिकांच्या विरुध्द होतो, म्हणून प्रस्थापितां विरुध्दच्या लिटिल मॅगेझिन्सच्या चळवळीत अग्रभागी होतो. माझ्या परपंरेपासून झालेल्या विच्छेदामुळे मला प्रस्थापित साहित्य आपले वाटत नव्हते. त्यात माझा व माझ्या समाजाचा चेहरा अदृश्य होता आणि तो माझ्या साहित्यातून उमटावा, ही माझी अपेक्षा होती'. ('अस्मितादर्श' दिवाळी अंक, १९७६ पृ.७२)

योगीराज वाघमारे- 'माझी कथा माझे अनुभवविश्व, त्यातूनच माझी कथा आकारत जाते. दाहक अनुभवांनी मी कित्येकदा दुभंगुन गेलो आहे !'

दलितातील पांढरपेशेपण हेही माझ्या लेखनाचे विषय आहेत. आजपर्यंत हा समाज शिक्षणापासून वंचित होता. आता शिक्षणाचे या समाजात क्रांती केलेली आहे; पण यातील काही तरुण सामाजिक बांधिलकी नाकारतात. आपण समाजाचे काही लागत नाही, असा त्यांचा ग्रह झालेला आहे. 'बेगड', 'माझं चुकलं', 'पराभव' ह्या कथात मी अशा प्रवृत्ती चितारल्या आहेत. ('अस्मितादर्श' दिवाळी अंक, १९७६ पृ.६१)

दलित जीवनातील दाहक अनुभव या अनुभवांना प्रकट करणारी अंतशक्ती दलित साहित्याच्या निर्मितीत महत्वाची आहे, प्रा.रा.ग.जाधव यांनी आपल्या लेखातून दलितात अभिजनवर्ग निर्माण होणे महत्वाचे मानले आहे. दलित साहित्याला दलित समाजातून असा स्वतःचा वर्ग तयार झाल्यानंतर दलित अभिजनवर्ग दलित साहित्याच्या स्वरुपाची, गुणदोषांची व इस्टानिष्ट प्रवृत्तीची दखल घेईल म्हणूनच 'जी जी कला साहित्यनिर्मिती समाजात होत राहते, तिचे स्वागत करणारा आणि परंपरेने तिची जपणूक करणारा अभिजनवर्ग कला-साहित्याची मीमांसाही करीत राहतो. जसा हा वर्ग कला साहित्य निर्मितीचे क्षेत्र केवळ टिकवतोच असे नाही, तर ते अधिक समृध्द करण्यासाठीही प्रतिसाद देत असतो'.[१] असे मत मांडलेले आहे.

'दलित साहित्याने फक्त वाड्मयीन क्षेत्रातच परिवर्तन केले आहे असे नसून या साहित्याने सामाजिक जीवनातसुध्दा विविध संदर्भ दिलेले आहेत. एकूण साहित्यविषयक मूल्य व जीवनविषयक मूल्य यांचा संबंध शोधण्याची गरज या साहित्याने अधोरेखित केली. मराठीतील समीक्षा प्रत्यक्ष निर्माण होणाऱ्या वाड्मयकृतीच्या संदर्भात उपस्थित होणाऱ्या प्रश्नांची आहे. त्यामुळेच ती सदैव उपरी राहिली. दलित वाड्मयाच्या संदर्भात तर तिचे उपरेपण फारच उघड पडले आहे'.[२] आज निर्माण होणाऱ्या दलित साहित्याने समीक्षेच्या क्षेत्रात साहित्याचे रुप, समीक्षापध्दती, आविष्कारवा या संदर्भात प्रामुख्याने प्रश्न उपस्थित केल्याचे दिसून येते.

संदर्भ :-

१) जाधव रा.ग.दलित अभिजनवाद घअस्मितादर्शङदिवाळी ७६ पृ.५०

२) मांडे प्रभाकर-दलित साहित्याचे निराळेपण-अस्मितादर्श- ऑक्टो-नोव्हे-डिसेंबर ७५ पृ.७.

❑❑❑

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded